loknayak 31.05.2026 Copy - Copy:Copy of Layout 1 5/30/2026 10:48 PM Page 1

बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → रविवार दि.३ मे २०२६ → वर्ष १० वे → अंक -११ → पाने ४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Sunday Date: 31 May 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

# कडक उन्हात पाटलांचे उपोषण

## मी उन्हात बसलो, तुम्हाला चटके बसणार; मनोज जरांगें पाटलांचा सरकारला थेट इशारा



**सरकारच्या आश्वासनांचे ड्राफ्टमधील मुद्दे**
**सरकारने तयार केलेल्या या ड्राफ्टमध्ये मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर आश्वासने देण्यात आ-लेली आहेत.त्यामध्ये मराठा आरक्षण कक्ष पुढील एक महिन्यात सुरू करण्यात येईल,नोंदी शोधणे, प्रमाणपत्र वाटप आणि जात पडताळणीसाठी एक हेल्पलाइन ८ दिवसात सुरू करणार , कुणबी प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी sop तयार केली आहे., आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसाना १५ दिवसात अर्थसहाय्य देण्यात येईल. , कामामध्ये निष्काळजी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.**

**लोकनायक वृत्तसेवा -**
मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील आक्रमक झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे भरउन्ह-ातशेतात बसून त्यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. सरकारनेदिलेली आश्वासने आणि मराठा समाजाच्या मागण्यांबाबत अद्यापठोस निर्णय न झाल्याने जरांगे यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. दरम्यान जरांगे पाटलांची मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट आज घेतली असून लवकरच ते सरकारच्यावतीने ड्राफ्ट घेवून परत येणार असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे. उपोषणाच्यापहिल्याच दिवशी जरांगे यांनी सरकारला इशारा देत ठाम भूमिका मांडली. मी उन्हात बसलो, तर तुम्हाला चटके बसतील, असा थेट इशारा देत त्यांनी आंदोलनाकडे दुर्लक्ष न करण्याचा संदेश दिला. मराठा समाजावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करताना ते म्हणाले, मराठा समाजावर झालेला अन्याय मी सहन करू शकत नाही. सरकार आणि प्रशासनाला उद्देशून बोलताना जरांगे पाटील यांनी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करू नये, अशी विनंती केली. आमचं आंदोलन हाणून पाडण्याचा प्रयत्न करू नका. आंदोलन मोडण्याचा प्रयत्न केला, तर ते आणखी लांबेल, असा इशाराही त्यांनी दिला. मराठा **पान २ वर**



# शिवसंवाद दौऱ्यातून संघटन बळकटीचा निर्धार

## खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांचे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

**लोकनायक वृत्तसेवा -**
मराठवाड्यात सुरू असलेल्या शिवसेनेच्या 'शिवसंवाद दौऱ्या'च्या दुसऱ्या टप्प्यात गेवराई व आष्टी विधानसभा मतदारसंघांतील पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी तसेच शिवसैनिकांच्या आढावा बैठका उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बळकटी, बूथनिहाय नियोजन, गावपातळीवरील पक्षविस्तार आणि जनसंपर्क मोहिमेच्या कामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.



बैठकीत मार्गदर्शन करताना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पदाधिकाऱ्यांना जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. सत्तेचा उपयोग सर्वसामान्य नागरिक व शिवसैनिकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी व्हावा, असे सांगत त्यांनी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या मतदारसंघातील अडीअडचणींचा नियमित आढावा घेऊन पक्ष नेतृत्वाच्या संपर्कात राहावे, असे निर्देश दिले.ङ्कराजकारण हे केवळ सत्ता मिळवण्यासाठी नसून जनतेची सेवा करण्याचे माध्यम आहे. लोकांची कामे झाली तर शिवसेनेबद्दलचा विश्वास अधिक दृढ होईल आणि आगामी निवडणुकांमध्ये जनतेचा पाठिंबा वाढेल,ङ्ख असे डॉ. श्रीकांत शिंदे म्हणाले.

यावेळी त्यांनी निष्क्रिय पदाधिकाऱ्यांनाही स्पष्ट शब्दांत इशारा दिला. ङ्ककेवळ पद घेऊन मिरवणूक करणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे. शिवसेना वाढीसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येक पदाधिकाऱ्याच्या पाठीशी मी ठामपणे उभा राहीन,ङ्ख असे ते म्हणाले. तसेच जिल्हाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले.
मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या (डखठ) अनुषंगाने प्रत्येक बूथवर संघटना अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी पडताळणी, बोगस नावे वगळणे तसेच बीएलए, शाखाप्रमुख आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी अधिक जबाबदारीने **पान २ वर**

# घराचा वाद; पोटच्या मुलाने वडीलावर केला जीवघेणा हल्ला!

लोकनायक वृत्तसेवा - पैसे व जमिनीच्या वादात नात्याला काळीमा फासण्याच्याअनेक घटना जिल्ह्यात घडतआहेत, पेठ बीड भागात राहणारे वैजनाथ नामदेव गुंजाळ या वृद्ध व्यक्तीला सख्या मुलाने घर नावावर करून द्या म्हणत गंभीर मारहाण केली, या मारहाणीत वैजनाथ गुंजाळ यांचे कान तुटलेअसून कानाला चार टाके लागले आहेत, या मारहाणीत वैजनाथ गुंजाळ यांचा मुलगा कृष्णा वैजनाथ गुंजाळ, त्यांचीसून ज्योती कृष्णा गुंजाळ, व सखी मुलगी ज्योती विटेकर यांचा सहभाग सून भांडण सोडवणारा वैजनाथ यांचा लहान मुलगा शंकर गुंजाळ व त्यांच्या धर्मपत्नी यांनाही मारहाण करण्यात आली आहे. दिनांक २६ मे रोजी ही गंभी र घटना घडली असून **पान २ वर**

KJ खंडेलवाल ज्वेलर्स (अकोला) प्रा. लि.
सोनं म्हणजे खंडेलवाल
अकोला का शुद्ध सोना,
अब आप के शहर में ।
KJ9 जालना
भव्य शुभारंभ
मुख्य अतिथि
मा. श्री. अविनाश जी गुप्ता
Vice President, All India Gem & Jewellery Domestic Council (GJC)
प्रमुख उपस्थिति
प्राजक्ता माली
सीने तारीका, महाराष्ट्राची हास्य जत्रा & फुलवंती फेम
KHANDELWAL JEWELLERS
रविवार
दि. 31 मई 2026
सुबह 11:30 बजे से
KJ-9, खंडेलवाल ज्वेलर्स,
Opp. आदित्य कॉम्प्लेक्स,
बड़ी सडक, जालना
95454 54708
आपकी उपस्थिती प्रार्थनीय.
आपके आगमन की प्रतीक्षा में
खंडेलवाल ज्वेलर्स परिवार
अकोला | बुलढाणा | वाशिम | वरुड | जालना | मुंबई +91-9545 454 711 +91-9545 454 712

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर
ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर,
ॲल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील
तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर
सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.
पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णमंदीर रोड बीड

श्रीराज कॉन्ट्रॅक्टर प्रायव्हेट लिमिटेड
छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित कंपनीत
कामासाठी कर्मचारी पाहिजे
हेल्पर १०
सुपरवायझर २
फॅब्रिकेटर २
कारपेंटर २
सिक्युरिटी गार्ड २
ड्रायव्हर 4
शिक्षण/पात्रता
शिक्षणाची अट नाही
(पात्रता: अनुभवी उमेदवारांना प्राधान्य)
पगार
₹12,000 to ₹25,000
(experience-based)
इतर सुविधा PF ESIC
पत्ता: शॉप नं. ११
तापडिया कॉम्प्लेक्स
बीड - ४३११२२
संपर्क करा
९४०५९४१८९४
९४२३१७२०७४
९४२०२००९०६

लोकनायक
रविवार दि.३१ मे २०२६
२

# लोकमाता अहिल्याबाई होळकर : आदर्श राज्यकर्ती, न्यायप्रिय शासक आणि समाजसेवेचा दीपस्तंभ

**लोकनायक वृत्तसेवा –**
भारतीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ महिला राज्यकर्त्यांमध्ये लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. प्रशासन, न्याय, लोककल्याण, धर्मकार्य आणि विकास यांचा समतोल साधणाऱ्या त्या एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होत्या. आजच्या आधुनिक लोकाभिमुख शासन व्यवस्थेची अनेक तत्त्वे त्यांच्या कारभारात दिसून येतात. महेश्वरची राजधानी आणि विकासदृष्टी
अहिल्याबाईंनी नर्मदा नदीच्या तीरावर वसलेल्या महेश्वरला आपल्या राज्याची राजधानी बनवले. महेश्वर केवळ प्रशासकीय केंद्र राहिले नाही, तर ते सांस्कृतिक, धार्मिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून विकसित झाले. आज जगप्रसिद्ध असलेली 'महेश्वरी साडी' परंपरा त्यांच्या काळातच बहरली. विणकरांना प्रोत्साहन देऊन त्यांनी स्थानिक उद्योगांना चालना दिली आणि हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला. लोकाभिमुख प्रशासन अहिल्याबाई दररोज प्रजेच्या तक्रारी ऐकत असत. दरबारात कोणत्याही व्यक्तीला आपली समस्या मांडण्याची मुभा होती. शासनाचा केंद्रबिंदू प्रजा असावी, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत भ्रष्टाचार, अन्याय आणि शोषणाला आळा बसला.

त्या काळातील अनेक परदेशी प्रवासी आणि इतिहासकारांनी त्यांच्या राज्यकारभाराचे कौतुक केले आहे. त्यांच्या प्रशासनात सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सौहार्द यांना विशेष महत्त्व होते. शेतकरी आणि व्यापाऱ्यांची हितचिंतक अहिल्याबाईंनी शेतीला राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले. शेतकऱ्यांवरील करांचा भार कमी ठेवण्याचा प्रयत्न केला. दुष्काळ किंवा नैसर्गिक संकटांच्या काळात महसुलात सवलती देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून दिल्यामुळे मालवा प्रदेश देशातील प्रमुख व्यापारी केंद्रांपैकी एक बनला. व्यापारी मार्गांचा विकास, बाजारपेठांची उभारणी आणि सुरक्षेची व्यवस्था यामुळे व्यापाराला मोठी चालना मिळाली. धार्मिक एकात्मतेचा संदेश अहिल्याबाई कट्टर नव्हत्या, तर धर्मनिष्ठ आणि सर्वसमावेशक होत्या. हिंदू धर्माच्या संवर्धनासाठी त्यांनी मोठे कार्य केले; परंतु इतर धर्मीयांबद्दलही आदराची भूमिका ठेवली. त्यांच्या राज्यात सर्व धर्मांच्या लोकांना समान वागणूक मिळत होती.त्यांनी केवळ मंदिरेच नव्हे तर यात्रेकरूंसाठी धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी, तलाव आणि घाट बांधून लोकसेवेचे व्यापक कार्य केले. अहिल्याबाईच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट जारी केले आहे. अनेक विद्यापीठे, शासकीय योजना, चौक, रस्ते आणि पुरस्कारांना त्यांचे नाव देण्यात आले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करताना अनेक इतिहासकार त्यांना 'भारताच्या आदर्श महिला शासक' म्हणून संबोधतात.
प्रेरणादायी विचार
अहिल्याबाईच्या जीवनातून पुढील मूल्ये शिकण्यास मिळतात:
* संकटांवर मात करण्याचे धैर्य
* लोककल्याणासाठी समर्पित नेतृत्व
* न्याय आणि पारदर्शकता
* साधेपणा आणि सेवाभाव
* स्त्रीशक्तीचे सामर्थ्य
* धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक दृष्टीकोन

इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व
छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना रुजवली, तर लोकमाता अहिल्याबाई होळकर यांनी सुराज्याची आदर्श अंमलबजावणी करून दाखवली. त्यांच्या कार्यामुळे मालवा प्रदेश समृद्ध, सुरक्षित आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न बनला. आज, त्यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजहित, स्त्रीसक्षमीकरण, न्याय आणि




विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प करूया. लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे केवळ इतिहास नसून प्रत्येक पिढीसाठी प्रेरणेचा अखंड झरा आहे.
'राजकारणात सत्ता, प्रशासनात न्याय, समाजकारणात सेवा आणि जीवनात साधेपणा यांचे अद्वितीय उदाहरण म्हणजे लोकमाता अहिल्याबाई होळकर.
भारतीय इतिहासातील सर्वश्रेष्ठ महिला राज्यकर्त्यांमध्ये लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. प्रशासन, न्याय, लोककल्याण, धर्मकार्य आणि विकास यांचा समतोल साधणाऱ्या त्या एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होत्या. आजच्या आधुनिक लोकाभिमुख शासन व्यवस्थेची अनेक तत्त्वे त्यांच्या कारभारात दिसून येतात. महेश्वरची राजधानी आणि विकासदृष्टी
अहिल्याबाईंनी नर्मदा नदीच्या तीरावर वसलेल्या महेश्वरला आपल्या राज्याची राजधानी बनवले. महेश्वर केवळ प्रशासकीय केंद्र राहिले नाही, तर ते सांस्कृतिक, धार्मिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून विकसित झाले. आज जगप्रसिद्ध असलेली 'महेश्वरी साडी' परंपरा त्यांच्या काळातच बहरली. विणकरांना प्रोत्साहन देऊन त्यांनी स्थानिक उद्योगांना चालना दिली आणि हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिला. लोकाभिमुख प्रशासन अहिल्याबाई दररोज प्रजेच्या तक्रारी ऐकत असत. दरबारात कोणत्याही व्यक्तीला आपली समस्या मांडण्याची मुभा होती. शासनाचा केंद्रबिंदू प्रजा असावी, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत भ्रष्टाचार, अन्याय आणि शोषणाला आळा बसला.
त्या काळातील अनेक परदेशी प्रवासी आणि इतिहासकारांनी त्यांच्या राज्यकारभाराचे कौतुक केले आहे. त्यांच्या प्रशासनात सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सौहार्द यांना विशेष महत्त्व होते. शेतकरी आणि व्यापाऱ्यांची हितचिंतक अहिल्याबाईंनी शेतीला राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले. शेतकऱ्यांवरील करांचा भार कमी ठेवण्याचा
प्रयत्न केला. दुष्काळ किंवा नैसर्गिक संकटांच्या काळात महसुलात सवलती देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून दिल्यामुळे मालवा प्रदेश देशातील प्रमुख व्यापारी केंद्रांपैकी एक बनला. व्यापारी मार्गांचा विकास, बाजारपेठांची उभारणी आणि सुरक्षेची व्यवस्था यामुळे व्यापाराला मोठी चालना मिळाली. धार्मिक एकात्मतेचा संदेश अहिल्याबाई कट्टर नव्हत्या, तर धर्मनिष्ठ आणि सर्वसमावेशक होत्या. हिंदू धर्माच्या संवर्धनासाठी त्यांनी मोठे कार्य केले;
परंतु इतर धर्मीयांबद्दलही आदराची भूमिका ठेवली. त्यांच्या राज्यात सर्व धर्मांच्या लोकांना समान वागणूक मिळत होती.त्यांनी केवळ मंदिरेच नव्हे तर यात्रेकरूंसाठी धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी, तलाव आणि घाट बांधून लोकसेवेचे व्यापक कार्य केले. अहिल्याबाईच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ टपाल तिकीट जारी केले आहे. अनेक विद्यापीठे,
शासकीय योजना, चौक, रस्ते आणि पुरस्कारांना त्यांचे नाव देण्यात आले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करताना अनेक इतिहासकार त्यांना 'भारताच्या आदर्श महिला शासक' म्हणून संबोधतात.
प्रेरणादायी विचार
अहिल्याबाईच्या जीवनातून पुढील मूल्ये शिकण्यास मिळतात:
* संकटांवर मात करण्याचे धैर्य
* लोककल्याणासाठी समर्पित नेतृत्व
* न्याय आणि पारदर्शकता
* साधेपणा आणि सेवाभाव
* स्त्रीशक्तीचे सामर्थ्य
* धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक दृष्टीकोन

इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व
छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना रुजवली, तर लोकमाता अहिल्याबाई होळकर यांनी सुराज्याची आदर्श अंमलबजावणी करून दाखवली. त्यांच्या कार्यामुळे मालवा प्रदेश समृद्ध, सुरक्षित आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न बनला. आज, त्यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून
समाजहित, स्त्रीसक्षमीकरण, न्याय आणि विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प करूया. लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे केवळ इतिहास नसून प्रत्येक पिढीसाठी प्रेरणेचा अखंड झरा आहे.
'राजकारणात सत्ता, प्रशासनात न्याय, समाजकारणात सेवा आणि जीवनात साधेपणा यांचे अद्वितीय उदाहरण म्हणजे लोकमाता अहिल्याबाई होळकर.

पान ४ वरून

**ज्ञान आणि संस्कारांच्या शिदोरीवर आयुष्याचा नवीन**
सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन २०२३ बॅचच्या ऐश्वर्या घुघे व रुपाली मुळे यांनी केले, तर २०२३ बॅचचा विद्यार्थी अक्षय मुंढे याने आभार मानले.

**काडीवडगाव येथे जयसिंग केसरी बैलगाडी शर्यतीत थरार रंगला ..**

**या कार्यक्रमाचे सुंदर असे नियोजन करण्यात आले होते यामध्ये वैद्यकीय व पशुवैद्यकीय सेवा,नाष्टा पाण्याची सोय,प्रेक्षकांना वेळोवेळी सूचना देण्यासाठी साऊंड सिस्टिम,लाईव्ह प्रक्षेपण,**
**ऊना पासुन संरक्षण मिळण्यासाठी मंडप आसण व्यावस्था,पार्कींग सुविधा,तगडा स्वयंसेवक व पो–लीस बंदोबस्तामध्ये ठेवण्यात आला होता.या स्पर्धेमध्ये प्रथम येण्याचा बहुमान नांदेवली येथील सर्जा आणि संभाजीनगर येथील सुंदर या जोडीने प्रथम क्रमांक पटकावत रोख रकम ५१ हाजार रु व मानाच्या दोन ढाल.तर द्वितीय क्रमांक माणिक सेट आणि रुद्रा यांच्या जोडीने पटकावला त्यांना रोख ४१ हजार रु पारीतोषीक मानाच्या दोन ढाल,तिसऱ्या क्रमांक वेदिका गाडे यांचा सर्जा आणि बाळू शिंदे यांचा मेजर या जोडीने पटकावल्याने त्यांना रोख ३१ हाजार मानाच्या दोन ढाल,चौथा क्रं.शंभू आणि शंभूराजा या जोडीने रोख २१ ह रु मानाच्या दोन ढाल,पाचव्या क्रंमांक मार्शल आणि भाईजा या जोडीने रोख रकम १५ हाजार रु मानच्या दोन दाल,सहवा क्रं पवन आणि कार्टून या जोडीने पटकावला त्यांना रोख रक्कम ११ हजार रु मानाच्या दोन ढाल,सातवा क्रंमांक संज्या आणि बबल्या या जोडीने त्यांना रोख रकम ७ हजार व मानाच्या दोन ढाल,आठवा क्रंमांक नायक आणि बल्मा या जोडीने पटकावला त्यांना रोख ५ हजार व मानाच्या दोन ढाल पारितोषिक उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते देण्यात आले.या कार्यक्रमाचे चांगले नियोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष बजरंग आप्पा साबळे यांच्या टिमने केले.बैलगाडा शर्यत शांतेत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून माजलगाव मतदार संघाचे युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके, नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप, कृ ऊ बा स सभापती संभाजी तात्या शिंदे,जि प स औदुंबर काका सावंत,मा स संदिपान अप्पा खळगे,डॉ दुधाने,कृ उ बा समितीचे संचालक सचिन भैय्या लंगडे,कृ ऊ बा स विश्वनाथ शिंदे,**
**महादेव अंभुरे,युवा नेतेॲड आनंद भैया काळे,**
**युवक काँग्रेसचे ता अध्यक्ष विश्वासराव आगे,नगरसेवक सचिन भैय्या सानप,**
**रा यु कॉं ता अध्यक्ष विकास मुंडे, युवा नेते अबेद भाई शेख,आदर्श मा सरपंच ज्ञानेश्वर माऊली सुरवसे,सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष ॲड माधव काका शेंडगे, सरपंच संघटनेचे उपाध्यक्ष गणेश भैया आंभुरे, संतोष दादा डावकर,युवा नेते दिनकर करांडे,ऊ सरपंच गोविंद बादाडे,सरपंच संतोष कदम,आबेद भाई,योगेश मात्रे,मा सरपंच लखन महागोविंद, नगरसेवक नागेश डिगे, गणेश मेत्रे समाधान उजगरे,सुंदर शेवाळे कारभारी वीर,अंगद घुगे,रामकृष्ण बादाडे सोमेश्वर टिळे,विजय मोरे,शहादेव शेंडागे,गोकुळ गवारे,राम नाईक,युवा नेते सतीश खोटे,हरीश बादाडे,दिलीप मस्करे,परशुराम मिसाळ,मच्छिंद्र झाटे,बालासाहेब राऊत, श्याम जाधव,सोमनाथ दराडे,अभिमान कदम,राजेभाऊ लंगे,राहुल चिंचकर,शहादेव शेंडगे,अंकुश नाईकवाडे,महादेव सावंत,श्रीनिवास निपटे, वृक्षराज निपटे,नरेंद्र घुमरे,बबन भिसे,गंगाबीश्म शिंदे यांच्यासह पंचक्रोशीतील हजारो नागरिक व पत्रकार उपस्थित होते.**

**तलवाड्यात अवैध मुरूम उत्खननाचा धुमाकूळ;**
..विभागाच्या स्थानिक ते वरिष्ठ पातळीवरील पदाधिकारी वर्गाने अर्थपूर्ण कानाडोळा केल्याच्या चर्चेला वेळोवेळी ऊधान आल्यावर संबंधित विभागाने वेळकाढु उत्तरे देत जेसीबी मालक चालक व ट्रॅक्टर मालक चालकांच्या मनोबलात दिवसेंदिवस वाढ होत गेल्याने पुन्हा एकदा तलवाडा परिसरात कोटी रुपयांचे आव्वाचे सव्वा बांधकामे सुरु झाल्याने जेसीबी मालक चालक व ट्रॅक्टर मालक चालकांना सोन्याचे दिवस आलेले असुन या अवैध उत्खनन वाहतुक करणाऱ्या विवीध वाहन मालक चालकांची अर्थीक देवाण घेवाण करत पाठराखण करण्यासाठी महसुलच्या अधिकाऱ्याने तलवाड्यात कार्यालय थाटल्याची नागरिकातुन जोरदार चर्चा होतांना ऐकावयास मिळत असतांना देखील तलवाडा येथील शिवाजी महाराज चौका जवळील हकेच्या अंतरावर आस–लेल्या माजलगाव रोड लगट मोठ्या प्रमाणात सुरु आसलेल्या बांधकामावर महसुलचा लाखो रुपयाचा महसुल बुडवत अवैध उत्खनन करत बांधकामावर आलेल्या लाखो रुपयाच्या मुरुमाची चौकशी होणार का आसा प्रश्न सर्वसामान्यातुन उपस्थित केला जात असुन जेसीबी चालक मालक व ट्रॅक्टर मालक चालकांना अवैधरित्या मुरुम उत्खनन करण्याची परवानगी देतय कौण हा मुद्दा अर्थीक तडजोडीतुन गौण ठेवल्या जात असल्याने जेसीबी मालक चालक रात्रीच्या वेळी गोदाकाठी अवैध वाळु वाहनात भरुन देत आसल्याचे नागरिक बोलत असुन महसुलच्या बोक्याच्या गळ्यात घंटा बांधणार कोण या चर्चेला तलवाडा परिसरात ऊधान आले आहे.

**श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड येथे सुरू असलेल्या मंदिर जीर्णोद्धाराच्या कामासाठी आ.सुहास ...**
पवित्र स्थळाच्या विकासासाठी योगदान देण्याची संधी मिळणे ही भाग्याची बाब आहे,ङ्घ असे सांगितले.
तर आ. नितीन पवार यांनीही गडाच्या धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वाचा उल्लेख करत मंदिर विकासासाठी आपले सहकार्य कायम राहील, अशी भावना व्यक्त केली. त्यांनी दिलेली दहा लाख रुपयांची देणगी मंदिर जीर्णोद्धाराच्या कामाला मोठी मदत ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.
सध्या गडावर मंदिर दुरुस्ती, सभामंडप उभारणी, परिसर विकास, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, भाविकांसाठी निवारा व अन्य सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. स्थानिक ग्रामस्थ, भक्तगण आणि विविध संस्थांकडूनही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला जात आहे.
या देणगीबद्दल मंदिर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने आ. सुहास कांदे आणि आ. नितीन पवार यांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या या योगदानामुळे मच्छिंद्रनाथ गडाच्या विकासकामांना अधिक गती मिळणार असून भाविकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

**पाटोदा येथे खासदार श्रीकांत शिंदे यांना ग्राहक ..**
आली आहेत. या पार्श्वभूमीवर ठेविदारांना न्याय मिळवून देण्यासाठी राजकीय आणि सामाजिक पातळीवर प्रयत्न तीव्र करण्यात आले आहेत. संसद रत्न खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, पाटोदा या ठिकाणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील शिवसेनेचे युवा नेते तथा युवा पत्रकार शुभम घोडके यांनी शिष्टमंडळासह त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी त्यांनी तिन्ही बँकांच्या गैरव्यवहारामुळे आणि आर्थिक कोंडीमुळे जिल्ह्यातील ठेविदारांवर आलेल्या संकटाची भीषणता खासदार शिंदे यांच्यासमोर मांडली.या निवेदनात प्रामुख्याने मागणी करण्यात आली आहे की, शासन स्तरावरून या बँकांच्या मालमत्तांचा ताबा घेऊन

पान १ वरून

**कडक उन्हात पाटलांचे उपोषण..**
आरक्षणाचा प्रश्न केवळ राजकारणाचा विषय नसून समाजाच्या अस्तित्वाचा मुद्दा असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. यावेळी बोलताना जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं कौतुक देखील केलं. एकनाथ शिंदेंनी जसं काम केलं, तसं कुणी करत नाही, असं वक्तव्य त्यांनी केलं. मात्र, सरकारने केवळ आश्वासनांवर
न थांबता प्रत्यक्ष निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**शिवसंवाद दौऱ्यातून संघटन बळकटीचा निर्धार..**
बूथस्तरावर काम करावे, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.
यावेळी बीड जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेतला. पुढे बोलताना ते म्हणाले, ङ्गहिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यासारखे खंबीर नेतृत्व आपल्याला लाभले आहे. सर्वसामान्य शिवसैनिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हे ध्येय समोर ठेवून संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे.ङ्घ आष्टी मतदारसंघात शिवसेना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असून गोरगरीब, दिनदुबळे व गरजू नागरिकांच्या मदतीसाठी पक्षाचे पदाधिकारी तत्परतेने धावून जात असल्याचेही गलधर यांनी सांगितले.
बैठकीस मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन, युवासेनेचे अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपनेत्या संगीता ठोंबरे, युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण, शिवसेना नेत्या संगीता चव्हाण, माजी आमदार सुनील धांडे यांच्यासह गेवराई व आष्टी मतदारसंघातील तालुका अध्यक्ष राहुल तात्या चोरे, शिरूर तालुकाअध्यक्ष किरण चव्हाण, आष्टी तालुकाध्यक्ष कुमार शेळके, उपजिल्हा प्रमुख जालिंदर वांडरे, शहराध्यक्ष वैभव वासकर, जिल्हासन्घटक गणेश जायभाये, युवा सेना शहर प्रमुख सचिन सव्वाशे, शेतकरी शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख संदीप सोनवणे, ओबीसी शेअरची संतोष बारगजे, तुकाराम नागरगोजे, सुंदर बापू जेधे,रमेश तांबारे, तुकाराम धनमोडे, शिवराज उगले, मोतीराम बडे, जालिंदर पवार, अशोक पवार,अमोल भाकरे शहादेव गिरी सुधाकर घोषिर, मंगेश वनवे, रामदास येवले, सुजित वालेकर, अक्षय आरसूळ, सिकंदर सरवदे, मनोज टेकाळे प्रतिभा ताई वणवे प्रियका ताई जाधव प्रतिभा ताई देशमुख विविध अंगीकृत संघटनांचे जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, जिल्हा संघटक, युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी, व्हीजेएनटी आघाडीचे पदाधिकारी, विभागप्रमुख, शाखाप्रमुख, बीएलए–२ तसेच असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
शिवसंवाद दौऱ्याच्या माध्यमातून संघटना अधिक मजबूत करण्याबरोबरच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रभावी नियोजन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

loknayak 31.05.2026 Copy - Copy:Copy of Layout 1 5/30/2026 10:48 PM Page 3



# कोराडी औष्णिक वीज केंद्रात कंत्राटदारांची दादागिरी

## खापरखेडाच्या कंत्राटदारांना शिवीगाळ व वाहने फोडण्याचा प्रयत्न

**लोकनायक वृत्तसेवा –** कोराडी औष्णिक वीज केंद्र येथे स्थानिक विरुद्ध बाहेरील कंत्राटदार असा वाद उफाळून आला असून परिसरातील वातावरण प्रचंड तापले आहे. सीएसआर फंडांतर्गत निघालेल्या २२ कोटी रुपयांच्या सिव्हिल (स्थापत्य विभाग) कामांच्या निविदा प्रक्रियेत कोराडी औष्णिक वीज केंद्रात कार्यरत स्थानिक कंत्राटदारांनाच काम देण्याची जाचक अट घालण्यात आल्याने निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून राजकीय नेत्यांच्या दबावाखाली अधिकाऱ्यांनी नियम डावलल्याचा गंभीर आरोप होत आहे यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



दोन दिवसांपूर्वी कोराडी औष्णिक वीज केंद्रात २२ कोटी रुपयांच्या कामांच्या निविदा निघाल्या होत्या. यामध्ये खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कार्यरत असलेले काही प्रशिक्षित कंत्राटदार केवळ १० लाख रुपयांच्या एका छोट्या कामाची निविदा भरण्यासाठी गेले होते मात्र या निविदा प्रक्रियेत सदर काम फक्त कोराडी येथील स्थानिक कंत्राटदारांनाच मिळेल अशी विशिष्ट आणि जाचक अट टाकण्यात आल्याचे समोर आले.
खापरखेडा येथील कंत्राटदारांनी या जाचक अटीवर चर्चा करण्यासाठी कोराडीच्या मुख्य अभियंत्यांची भेट मागितली होती मात्र खापरखेडाचे कंत्राटदार मुख्य अभियंत्यांना भेटायला येणार असल्याची गोपनीय माहिती कोराडीतीलच एका अधिकाऱ्याने स्थानिक कंत्राटदारांना माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

माहिती मिळताच कोराडीतील स्थानिक कंत्राटदारांनी खापरखेड्याच्या कंत्राटदारांना घेराव केला तुम्ही फक्त खापरखेड्यात काम करायचे कोराडीत पाऊल ठेवायचे नाही. तुम्हाला येथे एकही काम मिळणार नाही असे धमकावत त्यांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ सुरू केली. परिस्थिती इतकी चिघळली होती की काही कंत्राटदारांनी गाड्या फोडण्यासाठी हातात दगड उचलले तर काहींनी अंगावरील कपडे काढून अश्लील पद्धतीने विरोध प्रदर्शन करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
या अन्यायाविरुद्ध खापरखेड्याच्या कंत्राटदारांनीही तीव्र संताप व्यक्त केला आहे. खापरखेडा वीज केंद्रांतर्गत निघणारी बहुतांश मोठी कामे कोराडीतीलच कंत्राटदार करीत आहेत त्यामूळे खापरखेड्याच्या स्थानिक कंत्राटदारांवर उपासमारीची वेळ आली आहे खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कार्यरत कंत्राटदार स्थानिक प्रशासनाकडे कामाची मागणी करतात तेव्हा अधिकारी 'बजेट नाही' असे खोटे कारण सांगून त्यांची दिशाभूल करतात, असा थेट आरोप कंत्राटदारांनी केला आहे.
जर कोराडीत खापरखेड्याच्या कंत्राटदारांना बंदी घातली जात असेल तर यापुढे कोराडीच्या एकाही कंत्राटदाराला खापरखेड्यात पाऊल ठेवू देणार नाही आणि काम करू देणार नाही असा कडक इशारा खापरखेड्याच्या कंत्राटदारांनी दिला असून या घटनेचा जाहीर निषेध केला आहे.
महानिर्मितीच्या नियमांना हरताळ फासून केवळ राजकीय दबावापोटी कोराडीत विशिष्ट कंत्राटदारांची मक्तेदारी निर्माण केली जात असल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत आहे. अधिकाऱ्यांच्या अशा पक्षपाती भूमिकेमुळे ऊर्जा प्रकल्पांमधील अंतर्गत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेला मोठा धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी ऊर्जामंत्री आणि वरिष्ठ प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषी अधिकाऱ्यांवर व गुंडगिरी करणाऱ्या कंत्राटदारांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.
यासंदर्भात खापरखेडा चेमरी बिल्डिंग येथे कंत्राटदार संघटनेची बैठक ३० में शनिवरला पार पडली यावेळी जाहीर निषेध करण्यात आला असून यापुढे कोराडी औष्णिक वीज केंद्र परिसरातील कंत्राटदारांना खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात पाय ठेऊ देणार नाही असा आक्रमक पवित्रा घेतला आहे.

# वाढती उष्णता आणि लू : प्रत्येकाने घ्यावी काळजी

**लोकनायक वृत्तसेवा –** सध्या वाढत्या तापमानामुळे संपूर्ण वातावरण अक्षरशः तापले आहे. सकाळपासूनच उन्हाचा तडाखा जाणवू लागतो आणि दुपारी तर रस्त्यावर पडणारी उष्णता अंग भाजून काढते. ङ्गलूङ्ग म्हणजेच उष्ण वारे ही आता फक्त वाळवंटी भागापुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर शहरांपासून गावांपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्याचा परिणाम जाणवत आहे. या तीव्र उष्णतेचा सर्वाधिक फटका वृद्ध व्यक्ती, लहान मुले, आजारी रुग्ण आणि दिवसभर उन्हात काम करणाऱ्या मजुरांना बसत आहे.
बांधकामावर काम करणारे मजूर, शेतात दिवसभर कष्ट करणारे शेतकरी, रस्त्यावर काम करणारे कामगार यांना अनेकदा उन्हात तासन्तास काम करावे लागते. अशा परिस्थितीत शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते. डोके गरगरणे, अशक्तपणा, चक्कर येणे, उलट्या होणे, ताप येणे किंवा अचानक बेशुद्ध पडणे अशी लक्षणे दिसू शकतात. अनेकदा लोक या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात, परंतु हीच लूची सुरुवात असू शकते.
उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी शक्यतो डोक्यावर टोपी, गमछा किंवा कापड वापरावे. शरीर पूर्ण झाकेल असे हलक्या रंगाचे सैल कपडे घालावेत. वेळोवेळी सावलीत विश्रांती घेणे अत्यंत आवश्यक आहे. तहान लागण्याची वाट न पाहता सतत पाणी पिणे गरजेचे आहे. फक्त थंड पेयांवर अवलंबून न राहता ताक, लिंबूपाणी, नारळपाणी, सरबत यांसारखे नैसर्गिक पेय अधिक फायदेशीर ठरतात.
विशेष म्हणजे घरात राहणाऱ्या लोकांनीही ङ्गआपण बाहेर जात नाही, त्यामुळे आपल्याला काही होणार नाहीङ्ग असा गैरसमज करून घेऊ नये. घरातील बंद वातावरण, कमी पाणी पिणे, सतत पंखा किंवा एसीमध्ये राहणे यामुळेही शरीर डिहायड्रेट होऊ शकते. वृद्ध व्यक्ती आणि लहान मुलांना तहान कमी लागते, त्यामुळे त्यांच्या
शरीरात नकळत पाण्याची कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे घरात राहूनही पुरेसे पाणी पिणे, हलका आहार घेणे आणि दुपारच्या वेळेत शक्यतो विश्रांती घेणे आवश्यक आहे.
उन्हाळ्यात शरीर
थंड ठेवण्यासाठी द्रवपदार्थांचा आहारात समावेश करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः कच्च्या आंब्याचे पन्हे हे उष्णतेपासून संरक्षण करणारे पारंपरिक आणि प्रभावी पेय मानले जाते. कच्च्या आंब्यातील पोषक घटक शरीरातील मीठ आणि पाण्याचे संतुलन राखण्यास मदत करतात. याशिवाय ताक, लिंबूपाणी, कलिंगड, काकडी आणि फळांचा रस यांचा आहारात समावेश करावा.
आजच्या बदलत्या हवामानात उष्णतेकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. लू ही केवळ बाहेर फिरणाऱ्या लोकांची समस्या नसून प्रत्येकाच्या आरोग्यावर परिणाम
करणारी गंभीर परिस्थिती आहे.
त्यामुळे स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची काळजी घेणे, पुरेसे पाणी पिणे आणि योग्य आहार घेणे ही काळाची गरज बनली आहे.

# मराठवाड्यात शिवसेनेचा नवा चेहरा पुढे येणार ?

**लोकनायक वृत्तसेवा –** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील राजकीय वातावरण तापू लागले असून शिवसेनेचे सचिव तथा सहमुख्य संपर्क प्रमुख (मराठवाडा) डॉ. संजय लाखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर-जालना किंवा परभणी-हिंगोली या मतदारसंघांपैकी कोणत्याही मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रही मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. मराठवाड्यात गेल्या अनेक वर्षांपासून संघटनात्मक पातळीवर सातत्याने काम करणारे नेतृत्व म्हणून डॉ. लाखे पाटील यांची ओळख निर्माण झाली आहे.



पक्ष संघटन मजबूत करणे, कार्यकर्त्यांना बळ देणे, विविध सामाजिक प्रश्नांवर भूमिका मांडणे आणि जनसंपर्क वाढविणे या माध्यमातून त्यांनी मराठवाड्यात स्वतंत्र राजकीय स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत त्यांना संधी देण्याची मागणी कार्यकर्त्यांमधून जोर धरू लागली आहे. विशेष म्हणजे छत्रपती संभाजीनगर-जालना तसेच परभणी-हिंगोली हे दोन्ही मतदारसंघ शिवसेनेचे पारंपरिक बालेकिल्ले म्हणून ओळखले जातात. या मतदारसंघांत शिवसेनेची मजबूत संघटनात्मक ताकद असून पक्षाशी निष्ठावान असलेला मोठा मतदारवर्ग आहे. त्यामुळे या मतदारसंघांमध्ये उमेदवारी मिळविण्यासाठी अनेक इच्छुक प्रयत्नशील असले तरी डॉ. संजय लाखे पाटील यांचे नाव सध्या सर्वाधिक चर्चेत असल्याचे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पक्षविस्तारासाठी त्यांनी केलेले काम, युवकांमधील लोकप्रियता आणि पक्षश्रेष्ठींशी असलेला समन्वय यामुळे त्यांची दावेदारी अधिक मजबूत मानली जात आहे. शिवसेनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी देखील पक्ष नेतृत्वाकडे डॉ. लाखे पाटील यांना उमेदवारी देण्याची मागणी केली असल्याची माहिती आहे. राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील प्रभावी आणि

# पोलिस कर्मचारी विनायक राऊत सेवानिवृत्त पोलिस अधीक्षकांकडून सत्कार

**लोकनायक वृत्तसेवा :** पोलिस विभागात दीर्घकाळ प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावलेले पोलिस कर्मचारी विनायक राऊत हे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.
यावेळी पोलिस अधीक्षकांनी विनायक राऊत यांच्या सेवाकाळातील कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. राऊत यांनी आपल्या सेवाकाळात जबाबदारीने कर्तव्य पार पाडत विभागाची प्रतिष्ठा वाढविल्याचे त्यांनी सांगितले.
कार्यक्रमास पोलिस




विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी राऊत यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना निरोगी व आनंदी निवृत्ती जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.
विनायक राऊत यांनी सेवाकाळातील सहकाऱ्यांचे सहकार्य आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे वातावरण भावनिक व उत्साहपूर्ण होते.




# मोदी सरकारच्या १२ वर्षपूर्ती अभियानानिमित्त भाजपाची जिल्हा कार्यशाळा उत्साहात संपन्न

**लोक नायक वृत्तसेवा :** भारतीय जनता पार्टी, यवतमाळ जिल्ह्याच्या वतीने 'मोदी सरकारची १२ वर्षे - विकास, विश्वास व जनकल्याणाची' या अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केमिस्ट भवन, शिवाजीनगर यवतमाळ येथे करण्यात आले. सदर कार्यशाळा भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.कार्यशाळेचे उद्घाटन माजी मंत्री तथा जिल्ह्याचे नेते मदनभाऊ येरावार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आदिवासी विकास मंत्री अशोकराव उईके, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज भैय्या अहिर, आमदार राजूभाऊ तोडसाम, माजी आमदार अण्णासाहेब पारवेकर, जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार, कैलास बोंद्रे, रेखा कोटेकर, मोहन कणाके, शंतनू शेटे तसेच अभियान संयोजक प्रवीण कोकाटे व श्रीराम मेलकेवार उपस्थित होते.प्रास्ताविक मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष



ॲड. प्रफुल्ल चौहान यांनी मोदी सरकारच्या १२ वर्षपूर्ती अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची सविस्तर माहिती दिली. यामध्ये २५ जून पर्यावरण दिनानिमित्त स्वच्छता अभियान, प्लास्टिक निर्मूलन, ई-कचरा संकलन, वृक्षारोपण व वृक्ष संगोपन उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रत्येक मंडळात योग शिबिरांचे आयोजन, जनसंवाद शिबिर, जनकल्याण शिबिर, निबंध स्पर्धा, मोदी सरकारच्या विविध योजनांच्या लोगोवर आधारित रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच केंद्र सरकारच्या योजनांची प्रदर्शने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली.कार्यशाळेत एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून अभियानाचे स्वरूप, विविध उपक्रमांची अंमलबजावणी, लाभार्थी संपर्क अभियान तसेच कार्यक्रमांचे नियोजन याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.उद्घाटनपर भाषणात मदनभाऊ येरावार यांनी मोदी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांचा सन्मान करण्याचे आवाहन केले. 'घर-घर मोदी, जन-जन मोदी' हे अभियान प्रभावीपणे राबवून केंद्र सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी पार पाडावी, असे त्यांनी सांगितले.समारोपप्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज भैय्या अहिर यांनी बुद्धिजीवी संमेलन, सामाजिक संमेलन व विविध घटकांशी संवाद कार्यक्रम आयोजित करून समाजातील सर्व स्तरांपर्यंत मोदी सरकारची विकासगाथा पोहोचविण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन अभियान संयोजक श्रीराम मेलकेवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.या कार्यशाळेला जिल्ह्यातील मंडल अध्यक्ष, महामंत्री, मोर्चा पदाधिकारी, अभियान संयोजक व सहसंयोजक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

लोकनायक
रविवार दि.३१ मे २०२६


# ज्ञान आणि संस्कारांच्या शिदोरीवर आयुष्याचा नवीन प्रवास यशस्वी करा-डॉ.आदिती सारडा

## आदित्य फार्मसी महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**लोकनायक वृत्तसेवा –** निरोप समारंभ हा केवळ आठवणींना उजाळा देणारा आणि कृतज्ञता व्यक्त करणारा प्रसंग नसून, तो नवीन संधींच्या सुरुवातीची भावना निर्माण करणारा एक भावनिक क्षण असतो. या पवित्र प्रांगणात तुम्ही जे संस्कार आणि ज्ञान मिळवले आहे, तीच तुमच्या आयुष्याची खरी शिदोरी आहे. या शिदोरीच्या बळावर भविष्यातील नवीन प्रवासात यश मिळवून महाविद्यालयाचे नाव मोठे करा, असे आवाहन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य फार्मसी व आदित्य डी.फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. दि. ११ मे रोजी सायंकाळी ६ वाजता महाविद्यालय परिसरात अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात हा सोहळा पार पडला. सुमारे तीन तास चाललेल्या या कार्यक्रमाला ३०० हून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदित्य फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.डी.आर.पवार यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी गुरुकिल्ली दिली. ते म्हणाले, स्वप्न पाहणे सोपे असते, पण ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अपार मेहनत आणि सातत्याची गरज असते. विद्यार्थ्यांनी भविष्यात मोठ्या पदांवर पोहोचून देशाच्या विकासात योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले.



आदित्य डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर. शिंदे म्हणाले, निरोप म्हणजे कायमचे दूर जाणे नव्हे, तर नवीन जबाबदाऱ्यांकडे वाटचाल करणे होय. महाविद्यालयाचे दरवाजे तुमच्यासाठी नेहमीच उघडे राहतील. आयुष्यात मोठे होताना माणुसकी जपा,अशी भावनिक साद त्यांनी विद्यार्थ्यांना घातली.

या प्रसंगी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आपल्या प्रवासाला उजाळा दिला. विद्यार्थी भावना शिलीमकर मनोगत व्यक्त करताना, शैक्षणिक प्रवासात महाविद्यालय आणि संस्था कशाप्रकारे नेहमी पाठीशी खंबीरपणे उभी राहिली, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तर आदित्य मुंजाळ ने प्राध्यापकांच्या मेहनतीचे कौतुक करत, महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर कसा भर दिला जातो,याचे अनुभव कथन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. डी. आर. पवार, प्राचार्य डॉ. आर. आर. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.गोविंद मुंडे, डॉ. देवेश चव्हाण, डॉ. विशाल सनान्से, प्रा. प्रसाद चव्हाण, प्रा. मुंजाजी मुळे, प्रा.चैतन्य कुटे, प्रा. शितल शिंदे, प्रा. रोहिणी जाधव, प्रा. शुभम रांदड, प्रा. स्वाती धस, प्रा. शिवाजी तोरकड यांच्यासह **पान २ वर**

## श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड येथे सुरू असलेल्या मंदिर जीर्णोद्धाराच्या कामासाठी आ.सुहास कांदे, आ. नितीन पवार यांनी प्रत्येकी दहा लाख रुपयांची दिली देणगी

**लोकनायक वृत्तसेवा –** नाथ संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सध्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे व विकासाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असून या पवित्र कार्यासाठी विविध स्तरातून मदतीचा ओघ सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सुहास कांदे व आमदार नितीन पवार यांनी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी प्रत्येकी दहा लाख रुपयांची देणगी देत मोठ्या भक्तीभावातून योगदान दिले आहे.

मच्छिंद्रनाथ गड हे नाथ संप्रदायातील एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ मानले जाते.दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. गडावरील मंदिराचा जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, भाविकांसाठी सुविधा निर्माण करणे तसेच धार्मिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने विविध विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. या कामासाठी लोकप्रतिनिधी, भाविक व दानशूर व्यक्तींकडून सहकार्य मिळत आहे.



आ. सुहास कांदे यांनी मंदिराच्या विकासासाठी दहा लाख रुपयांची देणगी देत ङ्गमच्छिंद्रनाथ गड हे अध्यात्म, श्रद्धा आणि संस्कृतीचे केंद्र असून या **पान २ वर**

## तलवाड्यात अवैध मुरुम उत्खननाचा धुमाकूळ; महसूल प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**लोकनायक वृत्तसेवा –** गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन व महसुल हाद्दितील आणेक शासकिय गायरान जमीनी तसेच शासनाने चालक तसेच ट्रॅक्टर मालक चालकांनी मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन केल्याची बाब वेळोवेळी विवीध वृतपत्राच्या माध्यमातून व पर्यावरण प्रेमी



बंद(सिल) केलेल्या खदानी व पाटबंधारे विभागातील हाद्दितील जमीनीतुन सन २००२३ पासुन ते आज पर्यंत तलवाडा येथील व गेवराईसह तलवाडा परिसरातील जेसीबी मालक, सामाजिक बांधलकी जोपासना-या विवीध पदाधिका-यांच्या माध्यमातून शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणुन दिलेले आसतांना देखील महसुल व पाटबंधारे **पान २ वर**

## काडीवडगाव येथे जयसिंग केसरी बैलगाडी शर्यतीत थरार रंगला

### २३४ बैलगाडी शर्यतीत स्पर्धकांचा सहभाग

**लोकनायक वृत्तसेवा:–** वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वडवणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित केलेल्या जयसिंग केसरी २०२६ बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये प्रथम क्रमांक सर्जा आणि सुंदर, द्वितीय क्रमांक माणिक शेठ व रुद्रा यांच्या जोडीने, तिसरा क्रमांक मेजर आणि सर्जा यांनी पटकावला.शर्यत पाहण्यासाठी बैलगाडा प्रेमींनी भरभरून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याने धरण परिसरात यात्रेची स्वरूप प्राप्त झाले होते.यामध्ये २३४ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.



. तालुक्यात छत्रपती संभाजी महाराज जयंती निमीत्त जयसिंग केसरी २०२६ बैलगाडा शर्यत तिचे आयोजन गुरुवार दि २८ रोजी काडीवडगाव येथील सुसज्ज आशा भव्य मैदानात करण्यात आले होते.या कार्यक्रमात प्रथम बैलगाडी पूजन व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन माजलगाव मतदार संघाचे युवा नेते जयसिंग भैया सोळंके व उपस्थित मान्यवरांच्या शुभ हस्ते करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. **पान २ वर**

## पाटोदा येथे खासदार श्रीकांत शिंदे यांना ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड यांच्याकडून निवेदन सादर

### गेवराईतील ज्ञानराधा, छत्रपती व श्री.मंगलनाथ निधी बँकेच्या ठेविदारांचे पैसे तात्काळ मिळवून देण्याची मागणी

**लोकनायक वृत्तसेवा –** बीड जिल्ह्यातील हजारो सर्वसामान्य ठेविदारांचे कोट्यवधी रुपये अडकून पडलेल्या श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी, छत्रपती मल्टीस्टेट (गेवराई) आणि ज्ञानराधा मल्टीस्टेट (गेवराई) या तिन्ही बँकांकडून ग्राहकांना त्यांचे हक्काचे पैसे तात्काळ परत मिळावेत, यासाठी बीड जिल्हा दौऱ्यावर आलेले संसद रत्न खासदार श्री. श्रीकांत एकनाथ शिंदे यांची श्री अनिल गोविंदराव बोर्डे यांचे निवेदन येथील शिवसेनेचे नेते मुकेश महाजन व पत्रकार शुभम



घोडके यांच्या मार्फत प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना सविस्तर मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. पाटोदा येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र आणि शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी ही भेट घेतली.बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात ज्ञानराधा, छत्रपती आणि मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेत हजारो शेतकऱ्यांनी, कष्टकऱ्यांनी, महिलांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या कष्टाची कमाई, मुलींची लग्ने, मुलांचे शिक्षण आणि वैद्यकीय उपचारांसाठी मुदत ठेवी म्हणून बँकांमध्ये ठेवली होती. मात्र, गेल्या काही काळापासून या बँकांचे व्यवहार ठप्प झाल्यामुळे सर्वसामान्य ठेविदार हवालदिल झाले आहेत. अनेकांच्या घरात गंभीर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या असून, अनेक कुटुंबं उघड्यावर **पान २ वर**

## डिजिटल मिडिया परिषदेची मुंबई - ठाणे जिल्हा कार्यकारणी जाहीर

### डिजिटल क्रांतीचे नवे पर्व: मुंबई-ठाण्यातील पत्रकारांच्या बळाला मिळाली संघटनेची नवी धार

**लोकनायक वृत्तसेवा –** डिजिटल युगात वेगाने बदलत असलेल्या पत्रकारितेच्या प्रवासाला एक नवी दिशा आणि बळकटी मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मुंबईत एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गेली ८७ वर्षे पत्रकारांच्या हक्कासाठी लढा देणाऱ्या या मातृसंस्थेने आता डिजिटल मीडियाच्या वाढत्या प्रभावाचा विचार करून मुंबई आणि ठाणे विभागासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा केली आहे.मुंबई सीएसटी येथे पार पडलेल्या या दिमाखदार सोहळ्यात डिजिटल पत्रकारांच्या संरक्षणासह त्यांच्या न्याय्य हक्कासाठी संघटित होण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे



अध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि मुंबई अध्यक्ष राजा आदाटे यांच्यासह विभागीय सचिव दीपक कैतके व इतर मान्यवर उपस्थित होते.या नियुक्ती सोहळ्यात **पान २ वर**

## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्द्ल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com